महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ४७

# महाराजा सयाजीराव आणि बँक ऑफ बडोदा

देवदत्त कदम

बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ४७

# महाराजा सयाजीराव आणि बँक ऑफ बडोदा

देवदत्त कदम

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव आणि
बँक ऑफ बडोदा
इतिहास
देवदत्त कदम
●
प्रकाशन क्रमांक - ३३
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : देवदत्त कदम
'दत्तकृपा निवास', गर्ल्स हायस्कूलसमोर,
नवे पारगाव, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर - ४१६११३
८६९८६६८८०२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ५० रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/
  101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/
  1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# बँक ऑफ बडोदा

महाराजा सयाजीराव गायकवाड म्हणजे नवनिर्माणाचे मानदंड होते. त्यांच्या कारकीर्दीवर नजर टाकली असता याचे अनेक पुरावे सापडतात. त्यांनी कोणतेही काम हाती घेत असताना पूर्वतयारीला अनन्यसाधारण महत्त्व दिले होते. वेदोक्त सुरू करण्याअगोदर त्याची बौद्धिक तयारी करण्यासाठी सयाजीरावांनी ४-५ वर्षे घेतली. बालविवाह प्रतिबंधक कायदा करण्याअगोदर १०-१२ वर्षे त्यासाठीची तयारी केली. १९०६ ला बडोदा राज्यात सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्याची अंमलबजावणी करण्याअगोदर २४ वर्षे म्हणजे १८८२ पासून महाराजांनी या कामाचा आरंभ करून, येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करून या कायद्याच्या परिपूर्ण अंमलबजावणीची काळजी घेतली. अशी अनेक उदाहरणे देता येतील. आपल्या समाजाला आधुनिकतेच्या प्रवाहात घेऊन जात असताना हजारो वर्षांच्या पारंपरिक मानसिकतेतून बाहेर काढण्यासाठी महाराज प्रजेला मानसिक तयारीसाठी वेळ देत, त्यांच्या प्रबोधनासाठी

जाणीवपूर्वक प्रयत्न करत. याचे प्रमुख कारण असे होते की, कोणताही उपक्रम उत्तम पद्धतीने पुढे जाण्यासाठी तयारीसुद्धा मुळातून आणि सर्वसमावेशक असावी लागते.

या पार्श्वभूमीवर महाराजांनी १९०८ मध्ये स्थापन केलेल्या बँक ऑफ बडोदाच्या स्थापनेचा इतिहास विचारात घेतला तर या पूर्वतयारीची आपल्याला कल्पना येईल. राज्यातील शेती आणि उद्योग यांना बळकटी देणे हा बँक ऑफ बडोदाच्या स्थापनेमागील महाराजांचा मुख्य उद्देश होता. महाराजांनी आपल्या राज्यातील सुधारणांची सुरुवात धार्मिक सुधारणांनी केली, तीही आपल्या राजवाड्यापासून. त्यानंतरचा दुसरा टप्पा हा सामाजिक सुधारणांचा होता. धार्मिक आणि सामाजिक सुधारणांशिवाय आधुनिक उद्योग आणि शेती यांचा विकास होत नाही हे इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. या संदर्भात समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर यांचा ‘Protestant Ethics and Spirit of Capitalism’ हा ग्रंथ जिज्ञासूंनी पाहावा. ख्रिश्चन धर्मातील कॅथॉलिक हा परंपरावादी पंथ इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीच्या मार्गातील अडथळा होता. तर प्रोटेस्टंट हा सुधारणावादी पंथ इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीला कसा उपकारक ठरला याचे सिद्धांतन वेबर यांच्या वरील ग्रंथात आढळते.

१८८१ ला राज्यकारभार हाती आल्यापासून ते १९०८ ला बँक ऑफ बडोदाची स्थापना करेपर्यंत महाराजांनी केलेल्या

सुधारणांचा आपण ज्यावेळी विचार करतो तेव्हा महाराजांनी बँक ऑफ बडोदाच्या स्थापनेसाठी निवडलेली वेळ किती अचूक होती हे स्पष्ट होते. बँक ऑफ बडोदा आणि शेती-उद्योगाच्या विकासासाठी अमेरिकन अर्थतज्ज्ञ भारतात आणणारे सयाजीराव हे पहिले राज्यकर्ते होते. यातच बडोद्याच्या शेती आणि उद्योग क्षेत्रातील क्रांतिकारक विकासाची बीजे आपल्याला सापडतात. ११३ वर्षांपूर्वी महाराजांनी स्थापन केलेली ही बँक भारतातील सर्वोत्तम बँकांच्या यादीत पहिल्या तीन क्रमांकात आहे. जगातील १९ देशांमध्ये ९६ शाखांसह ती उत्तम स्थितीत कार्यरत असल्याचे दिसते. यामागे महाराजांनी केलेली भक्कम पायाभरणीच कारणीभूत असल्याचे स्पष्टपणे जाणवते.

## बडोद्याची अन्योन्य सहकारी मंडळी

१९०४ मध्ये ब्रिटिश भारतात सहकार कायदा अमलात येण्यापूर्वी १५ वर्षे अगोदर १८८९ साली बडोद्यात प्रा. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांच्या प्रयत्नातून 'अन्योन्य सहकारी मंडळी' या संस्थेची स्थापना करण्यात आली होती. ही भारतातील दुसरी सहकारी बँक होती. यापूर्वी गोविंद बाबाजी यांच्या वसई असोसिएशनने १८६२ मध्ये सहकारी पतपेढीचा प्रयोग केला होता. अरुण जोशींच्या मते, "ही महाराष्ट्रातील किंबहुना हिंदुस्थानातील पहिली सहकारी पेढी असावी." आज सुद्धा ही अन्योन्य सहकारी मंडळी अस्तित्वात असून तिचे अर्बन बँकेत रूपांतर करण्यात आले आहे. बडोद्यातील व्हर्नाक्युलर कॉलेज

ऑफ सायन्समध्ये अध्यापन करणाऱ्या प्रा. कवठेकर यांनी १८९७ मध्ये 'अर्थशास्त्र' हा मराठीतील या विषयावरील पहिला ग्रंथ लिहिला. अर्थशास्त्राची मूलतत्त्वे मराठीमधून मांडण्याचा हा पहिला प्रयत्न होता. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांना मदत करणे हा अन्योन्य सहकारी मंडळी संस्थेचा मुख्य उद्देश होता.

१९१५-१६ मध्ये या संस्थेचे एकूण २०० सभासद होते. तर संस्थेचे खेळते भांडवल ४८,९०५ रु. व सभासदांच्या ठेवी ३८,७७५ रु. होत्या. १९१७-१८ दरम्यान अन्योन्य सहकारी मंडळीची सभासद संख्या ३१६ झाली. तर एकूण खेळते भांडवल ७२,५९६ रु. पर्यंत वाढले. अन्योन्य सहकारी मंडळीने केलेल्या सूत्रबद्ध व्यवस्थापनामुळे अल्पावधीतच संस्थेची लक्षणीय प्रगती झाली. १९२३-२४ मध्ये संस्थेची सभासद संख्या ६७९ व खेळते भांडवल १,७८,४८४ रु. पर्यंत वाढले. ही आकडेवारी बडोद्यातील पहिल्या सहकारी संस्थेची सातत्यपूर्ण प्रगती अधोरेखित करते.

## व्हाईटनॅक : भारतात आलेला पहिला अमेरिकन अर्थतज्ज्ञ

१९०६ च्या अमेरिका दौऱ्यात महाराजा सयाजीरावांनी बुकर टी. वॉशिंग्टन आणि राल्फ व्हाईटनॅक यांची भेट घेतली. फिलाडेल्फिया येथील अमेरिकन ब्रिज कंपनीच्या खजिनदारांचे खासगी सचिव म्हणून काम सुरू करण्यापूर्वीच व्हाईटनॅक यांना उद्योग, हस्तकौशल्य, सुतारकाम इ. बाबींचा प्रत्यक्ष व्यावहारिक अनुभव होता. व्हाईटनॅक यांचे अनुभवाधारित कौशल्य पाहून

सयाजीराव महाराजांनी त्यांना बडोद्याचे औद्योगिक सल्लागार म्हणून नियुक्त केले. त्यावेळी व्हाईटनॅक यांचे वय अवघे ३० वर्षे होते. बडोद्यातील तत्कालीन ब्रिटिश रेसिडेंटने या नियुक्तीवर आक्षेप नोंदवला. भविष्यात व्हाईटनॅक यांच्याकडून बडोद्याच्या राजकीय प्रकरणांमध्ये हस्तक्षेप होण्याच्या भीतीने ब्रिटिश रेसिडेंटने व्हाईटनॅक यांची कौटुंबिक आणि इतर पार्श्वभूमीची माहिती मागवली.

परंतु नोव्हेंबर १९०६ मध्ये परदेश दौऱ्यावरून परतताना महाराज सयाजीराव व्हाईटनॅक यांना कोणतेही नियुक्तीचे पत्र देण्याआधीच आपल्याबरोबर बडोद्याला घेऊन आले. ब्रिटिश सरकारला कोणतीही कल्पना न देता सयाजीराव महाराजांनी बडोद्याच्या दिवाणांकरवी सहा महिने कालावधीसाठीचे नियुक्तिपत्र व्हाईटनॅक यांना दिले. बडोद्याचे तत्कालीन दिवाण आर. सी. दत्त यांनी २७ नोव्हेंबर १९०६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार व्हाईटनॅक यांची २५० डॉलर प्रतिमहिना वेतनावर 'Expert adviser in matters relating to the industrial development of the state' या पदावर नियुक्ती केली.

नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर व्हाईटनॅक यांनी चार पानी पत्र लिहून स्वत:ला आवश्यक बाबी दिवाणांना कळवल्या. या पत्रात बडोद्याची नोकरी स्वीकारण्यापाठीमागील भूमिका मांडताना 'भारताचे खरे रूप समजून घेऊन मायदेशी परतताना भारत देश आणि भारतीय लोक यांच्याबद्दल पूर्वग्रहविरहित सत्य घेऊन

जाण्याच्या इच्छेने ही नोकरी स्वीकारल्या'चे व्हाईटनॅक यांनी नोंदवले आहे. याच पत्रात व्हाईटनॅक यांनी 'बडोदा सरकारचे आर्थिक सल्लागार' अशी आपली पदनिश्चिती करण्याबरोबरच सेवेचा कालावधी दोन वर्षांपेक्षा अधिक आणि चार वर्षांपेक्षा कमी ठरवावा अशी विनंती केली. त्यांच्या या दोन्ही मागण्या मान्य करण्यात आल्या.

बडोदा संस्थानातील कमकुवत बँकिंग जाळे मजबूत करून उद्योगाला चालना देण्याच्या उद्देशाने सयाजीरावांनी व्हाईटनॅक यांनी मांडलेल्या प्रस्तावित 'People's Bank of Baroda' च्या मसुद्याला पाठिंबा दिला. याच दरम्यान बडोद्यात बँक ऑफ मुंबईच्या शाखा उघडण्याचे धोरण ठरवण्यात येत होते. बँक ऑफ मुंबईच्या शाखा बडोद्यात स्थापन झाल्यास बडोद्यातील आर्थिक ठेवी मुंबईला जाऊन त्याचा आर्थिक फायदा बडोद्याऐवजी मुंबईला होण्याची भीती उद्योजकांना वाटत होती. यावर मात करण्यासाठी सयाजीराव महाराजांनी व्हाईटनॅक यांच्या नेतृत्वाखाली बँक ऑफ बडोदाची स्थापना केली. बँक ऑफ बडोदाची स्थापना करत असताना व्हाईटनॅक यांनी खासगी पतसंस्था चालवणारे भांडवलदार, शासन आणि अन्य इच्छुक व्यक्तींमध्ये संवाद निर्माण केला.

बँकेच्या स्थापनेसाठी बडोदा सरकारने २,५०,००० रु. ठेवीची गुंतवणूक केली. या ठेवीबरोबरच वार्षिक ४ % व्याजदराने १५ वर्षांसाठी ७,५०,००० रु. रक्कमदेखील सरकारकडून उपलब्ध

करून देण्यात आली. व्हाईटनॅक यांनी तयार केलेल्या बँक ऑफ बडोदाच्या प्रस्तावाला १६ डिसेंबर १९०७ रोजी सयाजीराव महाराजांनी मंजुरी दिली. तत्पूर्वी महाराजांकडे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवताना लिहिलेल्या पत्रात व्हाईटनॅक यांनी त्यांना अपेक्षित बँकेचे कार्य स्पष्ट केले आहे. या पत्रात व्हाईटनॅक लिहितात, “बँकेच्या स्थापनेसाठी बडोदा सरकारने निधी दिला असला तरी सरकारच्या आर्थिक व्यवहारासाठी सातत्याने कर्ज पुरवून मदत करणे हे तिचे मुख्य कार्य नाही. तर जनतेला त्यांच्या औद्योगिक व्यवहारांसाठी अर्थसाहाय्य करणे हेच बँकेचे प्रमुख कर्तव्य आहे.” आजवरची बँक ऑफ बडोदाची वाटचाल विचारात घेता व्हाईटनॅक यांनी स्थापनेवेळी मांडलेला उद्देश सफल झाल्याचे दिसते.

जनतेला बँकेचा उद्देश आणि उपयुक्तता समजावून सांगण्यासाठी अमेरिकन टाऊन हॉल मीटिंगच्या धर्तीवर सार्वजनिक सभेचे आयोजन करण्याची कल्पना व्हाईटनॅक यांनी मांडली. त्यानुसार १९ जुलै १९०८ रोजी सयाजीरावांच्या उपस्थितीत बडोद्यात ही सार्वजनिक सभा पार पडली. त्याच्या दुसऱ्याच दिवशी २० जुलै १९०८ रोजी बडोदा कंपनी कायदा, १८९७ अंतर्गत बँक ऑफ बडोदाची नोंदणी करून औपचारिकपणे स्थापना करण्यात आली. बडोदा संस्थानाबरोबरच गुजरात, काठीयावाड आणि मुंबई प्रांतांमध्ये व्यवसाय करण्यास बँक ऑफ बडोदाला परवानगी देण्यात आली. यामध्ये बडोदा संस्थानातील जनतेला

भागभांडवलामध्ये प्राधान्य देण्याची तरतूद करण्यात आली होती. बँकेच्या संचालक मंडळामध्ये बडोद्यातील नामांकित आर्थिकदृष्ट्या संपन्न व्यक्ती, बडोदा सरकारचे महालेखापाल, राजघराण्याचे प्रतिनिधी संपतराव गायकवाड आणि व्हाईटनॅक यांचा समावेश होता. तर बँकेचे चेअरमन म्हणून विठ्ठलदास ठाकरसी यांची नियुक्ती करण्यात आली.

स्थापनेनंतर ३ वर्षांतच सरकारच्या वतीने आर्थिक व्यवहार करण्याचे काम कोषागाराकडून बँक ऑफ बडोद्याकडे देण्यात आले. १५ जून १९१० पासून बँक ऑफ बडोदाला संस्थानी बँक (State Bank) म्हणून मान्यता देण्यात आली. व्हाईटनॅक यांच्या नेतृत्वाखाली बँक ऑफ बडोदामध्ये खासगी भांडवल आणि सरकारी आश्रय यांचा सुंदर मेळ घालण्यात आला.

बडोदा सरकारचे आर्थिक सल्लागार म्हणून व्हाईटनॅक यांच्या नियुक्तीचा कार्यकाल ३ सप्टेंबर १९०९ रोजी संपुष्टात आला. नोकरीतून मुक्त झालेले व्हाईटनॅक उच्चशिक्षणासाठी हार्वर्ड विद्यापीठात गेले. त्यानंतर त्यांनी पॅरिस, म्युनिच आणि जपानमधील टोकियो येथील विद्यापीठांमध्ये प्रत्येकी एक वर्ष उच्चशिक्षण घेतले. परंतु बडोद्याच्या आठवणीने व्याकूळ झालेल्या व्हाईटनॅक यांनी २ ते ३ वर्षांच्या कालावधीसाठी दरमहा १५०० रु. वेतनावर नोकरी करण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु त्यावेळी रिक्त असणाऱ्या शिक्षण खात्याच्या संचालकपदी व्हाईटनॅक यांची नियुक्ती करण्यास ब्रिटिश रेसिडंट सेल्डन आणि

बडोद्याचे अधिकारी बी.एल. गुप्ता यांनी आक्षेप घेतला. बी.एल. गुप्ता यांनी 'व्हाईटनॅक यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण खाते सध्यापेक्षा अधिक कार्यक्षमतेने काम करू शकत नसल्याचे' मत नोंदवले.

१५ फेब्रुवारी १९१६ रोजी व्हाईटनॅक यांनी बडोद्याचे दिवाण मनुभाई मेहता यांना पत्र लिहून दरमहा १,२५० रु. वेतनावर बडोद्यात काम करण्यास तयार असल्याचे कळवले. याच पत्रात व्हाईटनॅक यांनी बडोद्यातील सुधारणांशी तुलना करत भारताच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीवर ग्रंथ लिहिण्याची इच्छा व्यक्त केली. अखेर १३ एप्रिल १९१७ रोजी सयाजीराव महाराजांनी व्हाईटनॅक यांच्या बडोद्यातील नियुक्तीला मान्यता दिली. या आदेशात सयाजीराव लिहितात, "मी शक्यतो मंत्र्याच्या शिफारशी मान्य करतो. आपल्या वाढत्या प्रशासकीय गरजांच्या पूर्ततेसाठी उत्तम इंग्रजी येणाऱ्या युरोपियन किंवा अमेरिकन व्यक्ती अत्यावश्यक आहेत असे आपल्याला वाटते. व्हाईटनॅक यांना तुलनेने अधिक वेतन द्यावे लागणार असले तरी त्यांना बडोद्याची माहिती असल्याने मी त्यांच्या नियुक्तीला संमती देतो." संस्थानाच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन त्या पूर्ण करण्यासाठी प्रसंगी परदेशातून उच्चशिक्षित मनुष्यबळ मिळवण्याची सयाजीरावांची धडपड यातून स्पष्ट होते.

अखेर १९१८ मध्ये सयाजीरावांनी व्हाईटनॅक यांची महसूल विभागात सहआयुक्त पदी नेमणूक केली. त्याचबरोबर उत्पादन

शुल्क, शेती आणि सहकारी पतपुरवठा विभागांचा देखील कार्यभार त्यांच्याकडे सोपवण्यात आला. पहिल्या महायुद्धाच्या काळात व्हाईटनॅक यांनी वस्तू दर नियंत्रक आणि नागरी पुरवठा इ. विभागाचे संचालक म्हणून जबाबदारी पार पाडली. १९०६ ते १९०९ दरम्यानच्या नियुक्तीच्या काळात व्हाईटनॅक यांनी मुख्यतः सल्लागाराची जबाबदारी पार पाडली. तर दुसऱ्यांदा नियुक्त झाल्यानंतर आर्थिक क्षेत्रातील जबाबदाऱ्या पार पडणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्याची भूमिका बजावली.

व्हाईटनॅक यांच्या मृत्यूनंतर त्यांचे जिवलग मित्र इल्लीनोईस यांनी ३ जून १९१९ रोजी बडोदा सरकारला पत्र लिहिले. 'American Economic Review' च्या डिसेंबर १९१९ च्या अंकात व्हाईटनॅक यांच्यावर मृत्युलेख लिहिण्यासाठी त्यांच्या बडोद्यातील कारकिर्दीविषयी माहिती देण्याची विनंती इल्लीनोईस यांनी या पत्रात केली होती. बडोद्याच्या दिवाणांच्या आदेशानुसार इल्लीनोईस यांचे पत्र तत्कालीन विजयनगरच्या महाराणींची सोबतीण म्हणून काम करणाऱ्या व्हाईटनॅक यांच्या पत्नीकडे पाठवण्यात आले. अशा प्रकारे व्हाईटनॅक यांची बडोद्यातील गौरवशाली कारकीर्द त्यांच्या मृत्यूनंतर संपुष्टात आली.

व्हाईटनॅक यांच्या माध्यमातून सयाजीरावांनी बडोद्यात आर्थिक विकासाची आदर्श व्यवस्था उभी केली. तर ५ जून १८८३ रोजी इंग्लंडमध्ये जन्मलेल्या जॉन केन्स या ब्रिटिश अर्थतज्ज्ञाने समष्टी

अर्थशास्त्राच्या (Macro Economics) विकासात क्रांतिकारक भूमिका बजावली. त्यांनी मांडलेल्या अर्थशास्त्रविषयक विचारातूनच अर्थशास्त्राच्या ‘केनेशियन ज्ञानशाखे’चा जन्म झाला. बँक ऑफ इंग्लंडचे संचालकपद भूषवलेले जॉन केन्स २० व्या शतकातील सर्वांत प्रभावी अर्थशास्त्रज्ञ मानले जातात. जॉन केन्स यांच्या संदर्भाने व्हाईटनॅक यांच्या बडोद्यातील नियुक्तीचे महत्त्व विशद करताना आनंद चंदावरकर लिहितात, “बडोद्याच्या आर्थिक सल्लागारपदी व्हाईटनॅक यांची झालेली नियुक्ती ही तत्कालीन भारतातील एकमेव घटना होती. १९१४ मध्ये जॉर्ज फिंडले शिरस (George Findlay Shirras) या अर्थशास्त्रज्ञाची भारताच्या सांख्यिकी विभागाच्या संचालक पदासाठी शिफारस करताना जॉन केन्स यांनी (सयाजीरावांनी उभारलेल्या) अशा प्रकारच्या व्यवस्थेचा विचारदेखील केला नव्हता. आश्चर्याची बाब म्हणजे व्हाईटनॅक यांच्या बडोद्यातील नियुक्तीवेळी ब्रिटनकडे देखील आर्थिक सल्लागार  नव्हता.” ही बाब सयाजीरावांच्या दूरदर्शी व्यवस्थापनाचा पुरावाच देते.

पुढे १९२९ मध्ये जॉन केन्स यांनी ते स्वतः सदस्य असलेल्या आर्थिक सल्लागार परिषदेत एकापेक्षा अधिक अर्थतज्ज्ञ व्यक्तींची नियुक्त करण्याचा सल्ला दिला. १९३५ मध्ये बी. के. मदन यांची पंजाब सरकारच्या आर्थिक सल्लागारपदी नेमणूक होईपर्यंत ब्रिटिश भारतातदेखील आर्थिक सल्लागार पद अस्तित्वात नव्हते. दोनच वर्षांनंतर १९३७ मध्ये लंडन स्कूल

ऑफ इकॉनॉमिक्समध्ये शिकलेल्या थिओडोर ग्रेगरी यांची भारत सरकारच्या आर्थिक सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली. एकाही प्रांतातील तत्कालीन काँग्रेस सरकारने याची योग्य दखल घेऊन अनुकरण केले नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंडित नेहरूंनी विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना प्रोत्साहन देत भारताच्या सर्वांगीण प्रगतीला चालना दिल्याचे आपण जाणतोच. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरूच्या कारकिर्दीतील आर्थिक सल्लागारांसंदर्भात आनंद चंदावरकर लिहितात, "स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्यान चंद यांची भारताचे पहिले आर्थिक सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली. परंतु ही नियुक्ती जास्त काळ टिकली नाही. नेहरूंनी केवळ आपला सल्लाच नव्हे तर आपल्या उपस्थितीकडेही दुर्लक्ष केल्याचे लक्षात आल्यानंतर स्वाभिमानी ग्यान चंद यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. वास्तविक ग्यान चंद यांचा पंडित नेहरूंशी कोणत्याही प्रकारचा वैचारिक मतभेद नव्हता. या पार्श्वभूमीवर सयाजीरावांसारख्या सरंजामशाही व्यवस्थेतील राजाने आर्थिक सल्लागारांचा उपयोग अति-आधुनिकतावादी मानले गेलेले भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांच्यापेक्षा अधिक धोरणीपणाने आणि मुत्सद्दी राजकारण्याप्रमाणे केल्याचे स्पष्टपणे दिसते. आपल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला समजून घेऊन योग्य वेळी पाठिंबा दिल्याशिवाय कोणताही राज्यकर्ता यशस्वी होऊ शकत नाही. व्हाईटनॅक आणि सयाजीराव

महाराज यांच्या व्यावहारिक नात्याच्या यशाने रिपब्लिक ऑफ कोलंबियाचे आर्थिक सल्लागार लाऊचीन करी यांनी मांडलेले आर्थिक सल्लागाराचे सूत्र पुन्हा एकदा सिद्ध केले आहे." आनंद चंदावरकर यांनी सप्रमाण मांडलेले हे मत सयाजीरावांचे अनन्यत्व सिद्ध करते.

तत्कालीन संपूर्ण जगाने आर्थिक क्षेत्रातील ब्रिटिश तज्ज्ञांची श्रेष्ठता मान्य केली असताना आणि ब्रिटिश आर्थिक तज्ज्ञ सहजासहजी उपलब्ध होत असतानादेखील सयाजीराव महाराजांनी त्याऐवजी अमेरिकन तज्ज्ञ व्हाईटनॅक यांची निवड का केली हे समजून घेणे आजही अत्यावश्यक ठरते. अभियांत्रिकी आणि स्थापत्यकलेसारख्या क्षेत्रात ब्रिटिश अधिकाऱ्यांची नेमणूक केल्यामुळे बडोदा संस्थान आणि ब्रिटिश सरकार यांच्यात हितसंबंधाविषयी संघर्ष निर्माण होण्याचा प्रश्न उद्भवत नव्हता. त्यामुळेच सयाजीरावांनी आपल्या संस्थानात आर.एफ. चिशोलम आणि मेजर मंट या ब्रिटिश स्थापत्यशास्त्रज्ञांची नियुक्ती केली होती. या स्थापत्यशास्त्रज्ञांनी लक्ष्मीविलास राजवाडा, कामाठी बाग आणि ब्रिटिश रेसिडेन्सीच्या उभारणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. परंतु बँकिंग आणि उद्योगाप्रमाणेच आर्थिक क्षेत्रातील बडोद्याच्या प्रगतीमुळे ब्रिटिश सरकार आणि संस्थान यांच्यात संघर्ष निर्माण होण्याची भीती सयाजीराव महाराजांना वाटत होती. भविष्यात निर्माण होऊ शकणारा हा संघर्ष टाळण्यासाठी सयाजीरावांनी व्हाईटनॅक यांची आर्थिक सल्लागारपदी नियुक्ती केली.

व्हाईटनॅक यांच्या नियुक्तीसाठी अन्य एक कारणदेखील तितकेच महत्त्वाचे ठरले. या संदर्भात आनंद चंदावरकर पुढे लिहितात, "व्हाईटनॅक हे अन्य ब्रिटिश अर्थतज्ज्ञांप्रमाणे हस्तिदंती मनोऱ्यातून समाजाकडे पाहणारे अर्थतज्ञ नव्हते. तर त्यांना अर्थशास्त्राच्या सैद्धांतिक ज्ञानाबरोबरच उद्योगांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव होता. व्हाईटनॅक हे भारतात अध्यापनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही क्षेत्रात नियुक्त होणारे पहिले अमेरिकन तज्ज्ञ होते." ज्ञान आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव यांचा मेळ घालणाऱ्या व्हाईटनॅक यांची आर्थिक सल्लागारपदी सयाजीरावांनी केलेली नेमणूक त्यांच्या दूरदर्शित्वाचा पुरावाच देते. या पार्श्वभूमीवर बँक ऑफ बडोदाच्या स्थापनेची पार्श्वभूमी आणि बडोद्याच्या आर्थिक विकासातील बँकेचे योगदान समजून घेणे अत्यावश्यक ठरते.

## बँक ऑफ बडोदाच्या स्थापनेची पार्श्वभूमी

राज्याधिकार प्राप्तीनंतर बडोद्याच्या आर्थिक विकासासाठी प्रयत्नशील राहिलेल्या सयाजीरावांनी १८९४ मध्ये संस्थानच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेण्याच्या उद्देशाने औद्योगिक आयोगाची स्थापना केली. या आयोगामध्ये तीन शासकीय आणि एक बिगर शासकीय अशा एकूण चार सदस्यांचा समावेश होता. बडोद्यातील बँकिंग क्षेत्राच्या इतिहासातील हा एक महत्त्वपूर्ण टप्पा होता. जनतेला किफायतशीर पद्धतीने पतपुरवठा करण्यासाठी प्रत्येक प्रांतात शासकीय बँकेची स्थापना करण्याची

शिफारस या आयोगाने केली. या शिफारशीनुसार १८९९-१९०० मध्ये नवसारी येथे २ कृषी बँकांची स्थापना करण्यात आली. या कृषी बँकांना प्रोत्साहन देण्यासाठी बडोदा सरकारकडून अनेक सवलती देण्यात आल्या. तर स्थानिक पातळीवर स्थापना करण्यात आलेल्या खेतीवाडी पेढ्या शेतकऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यात अपयशी ठरत असल्यामुळे काही उत्साही अधिकाऱ्यांच्या पुढाकाराने सहकारी बँकेची स्थापना करण्यात आली. १९०५ मध्ये बडोदा सरकारने पारित केलेल्या सहकारी संस्था कायद्याने पतपुरवठा संस्थांच्या स्थापनेला गती मिळाली. पुढे १९१३ मधील अन्य एका कायद्याने बिगर पतपुरवठा सहकारी संस्थांना चालना मिळाली.

बडोद्याच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी उद्योजकांना सुलभरीत्या पतपुरवठा करणे गरजेचे होते. हे ओळखूनच सयाजीरावांनी बडोद्यात बँक स्थापनेसाठी नव्याने प्रयत्न सुरू केले. याच दरम्यान बँक ऑफ मुंबईने बडोद्यात आपली शाखा सुरू करण्यासाठी परवानगी मागितली. परंतु त्यांनी अवास्तव सवलतींची मागणी केल्यामुळे त्यांना परवानगी नाकारण्यात आली. या संधीचा लाभ उचलण्यासाठी मुंबईस्थित इंडियन स्पेसी बँकेने बडोद्यात शाखा उघडण्याची परवानगी मागितली. परंतु ही परवानगी मागताना बडोद्यातील शाखेतील पैसा अन्य कोणत्याही शाखेत वर्ग करण्याची सवलतदेखील बँकेने मागितली. या मागणीवर बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञांनी

आक्षेप घेतल्यामुळे महाराजांनी ही मागणी फेटाळली. त्याऐवजी सरकारच्या आश्रयाने बडोद्यातील स्थानिक व्यक्तीला बँक स्थापनेसाठी प्रोत्साहन देण्याची सूचना या तज्ज्ञांनी केली.

सयाजीरावांनी १९०६ मध्ये अमेरिकन अर्थतज्ज्ञ व्हाईटनॅक यांची बडोद्याच्या आर्थिक सल्लागारपदी नियुक्ती केली होती. व्हाईटनॅक हे थेट महाराजांना उत्तरदायी होते. व्हाईटनॅक यांनी बडोद्यातील इतर बँकिंग तज्ज्ञांशी विचारविनिमय करून बँकेची रूपरेषा ठरवावी असे निश्चित करण्यात आले. त्यानुसार २९ जानेवारी १९०७ रोजी बडोद्याचे आर्थिक सल्लागार व्हाईटनॅक यांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत बडोदा संस्थानात स्थानिक बँक स्थापन करण्याचा ठराव संमत करण्यात आला. या बँकेला सरकारचा आश्रय मिळाल्यास ती अधिक यशस्वी होईल असा विश्वासदेखील या बैठकीत व्यक्त करण्यात आला होता.

सरकार आणि जनता यांच्या समान सहभागातून १० लाख रु. भांडवल (प्रत्येकी ५ लाख रु.) बँकेच्या स्थापनेवेळी गुंतवण्यात यावे असा ठरावदेखील या बैठकीत करण्यात आला. या भांडवलापैकी निम्मे भांडवल (५ लाख रु.) संस्थानातील नवसारी, कडी आणि अमरेली जिल्हे व संस्थानाबाहेर मुंबई, अहमदाबाद येथे बँकेच्या शाखा उघडण्यासाठी वापरावेत अशी सूचना या बैठकीत करण्यात आली. तर बँकेच्या संचालक मंडळात सरकारनियुक्त ३ (अकौंटंट जनरल आणि २ जनता

प्रतिनिधी) आणि भागधारकांनी निवडून दिलेले ४ अशा एकूण ७ सदस्यांचा समावेश करण्याची शिफारस करण्यात आली. या बैठकीत करण्यात आलेल्या शिफारशींच्या संदर्भातील अंतिम निर्णय महाराजांवर सोपवण्यात आला.

३ फेब्रुवारी १९०७ रोजी व्हाईटनॅक यांनी हरिभक्ती नामक जनता प्रतिनिधींना पत्र लिहून बँकेच्या स्थापनेसाठी प्रस्ताव तयार करण्याची आज्ञा महाराजांनी केली असल्याचे कळवले. हा प्रस्ताव तयार करण्याच्या कामी बँकिंग तज्ज्ञांनी नियुक्त केलेल्या ४-५ प्रतिनिधींच्या समितीची मदत मिळावी अशी अपेक्षा व्हाईटनॅक यांनी या पत्रात व्यक्त केली होती. अन्य बँकेच्या शाखेपेक्षा संस्थानची स्वतंत्र स्वमालकीची बँक स्थापन करण्याच्या आग्रहामागील आपली भूमिका विशद करताना व्हाईटनॅक यांनी बँकिंग व्यवसायातील आर्थिक गणित सप्रमाण मांडले. त्यांच्या मते, बडोदा संस्थानची स्वतंत्र बँक नसल्यामुळे सरकार आणि जनता यांना आपला पैसा मुंबई, अहमदाबाद व इतर ठिकाणच्या बँकांमध्ये गुंतवावा लागे. अशा प्रकारे संस्थानाबाहेर गुंतवण्यात आलेली रक्कम १ कोटी ५० लाख रु. इतकी होती. बडोद्यातील उद्योगांना भांडवलाची कमतरता जाणवत असताना संस्थानातील हा पैसा बाहेरील उद्योगांच्या भरभराटीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत होता. या पार्श्वभूमीवर बडोदा संस्थानने स्वतःची बँक स्थापन केल्यास संस्थानात नवीन गुंतवणूक वाढण्याची आशा व्हाईटनॅक यांनी व्यक्त केली.

बडोदा सरकारने संस्थानातील बँकिंग व्यवसायाशी संबंधित व्यावसायिक आणि तज्ज्ञ यांच्याशी सातत्याने बँकेच्या स्थापनेसंदर्भात चर्चा केली. बँकिंग तज्ज्ञ आणि सावकारांनी संपूर्ण सहकार्य केल्यास त्यांनी सुचवलेल्या सुधारणा अमलात आणण्यात काहीच अडचण नसल्याचे सयाजीरावांनी स्पष्ट केले. २२ मार्च १९०७ रोजी दिवाण केरशास्प रुस्तुमजी यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात या संदर्भातील आदेश देताना सयाजीराव लिहितात, “समितीने सुचवलेल्या सुधारणासंदर्भातील बडोद्यातील धनवंतांची मते लिखित स्वरूपात घेण्यात यावीत. आवश्यकता वाटल्यास समितीने त्यांच्याशी पुन्हा चर्चा करावी. धनवंत त्यांना योग्य वाटणाऱ्या सूचना सुचवू शकतात.” यानंतर व्हाईटनॅक यांनी हरिभक्ती यांना पुन्हा पत्र लिहून समितीशी झालेल्या विविध लहानसहान मतभेदांकडे दुर्लक्ष करण्याची विनंती केली. त्याचवेळी व्हाईटनॅक यांनी बँकेकडून बडोदा सरकारला देखील कोणताही अतिरिक्त लाभ दिला जाणार नसल्याचे हरिभक्ती यांना स्पष्टपणे कळवले.

अखेर ५ एप्रिल १९०७ रोजी बँक व्यावसायिक, सावकार आणि तज्ज्ञांनी पत्र लिहून सहकार्य करण्यास तयार असल्याचे बडोदा सरकारला कळवले. याच पत्रात तज्ज्ञांनी बँकेच्या ‘बँक ऑफ बडोदा’ अशा नामकरणास मान्यता दिली. या पत्रात बँकिंग तज्ज्ञ आणि बडोद्यातील सावकारांनी पुढील मागण्या केल्या होत्या;

१) बँकेला आर्थिक स्थैर्य मिळण्यासाठी बडोदा सरकारने आपले सर्व व्यवहार बँक ऑफ बडोदाच्या माध्यमातून करून बँकेच्या सर्वांत मोठ्या ग्राहकाची भूमिका पार पाडावी.

२) बँकेच्या परस्पर स्वतःहून कोणत्याही संस्थेला कर्ज देणार नसल्याची हमी बडोदा सरकारने द्यावी.

३) बँकेच्या भागभांडवलाच्या २५ % इतकी बिनव्याजी रक्कम गुंतवून सरकारने बँकेला आर्थिक ताकद द्यावी. याचवेळी ३ लाख रु.पेक्षा जास्त रक्कम न गुंतवण्याची सरकारची अट या तज्ज्ञांनी मान्य केली.

४) बँकेतील शासकीय खात्यांचे लेखापरीक्षण सरकारी खर्चाने करण्यात यावे.

५) सरकारच्या वतीने बँकेने करावयाच्या व्यवहारांसाठी स्वतंत्र चालू खाते काढण्यात यावे. या खात्यावरील व्यवहारांसाठी बँक सरकारला कोणतेही व्याज द्यावे लागणार नाही. याउलट सरकारने खात्यातील रकमेपेक्षा अधिक रक्कम काढल्यास त्या रकमेवर कर्जाप्रमाणे तत्कालीन दराने व्याज आकारणी करण्यात यावी.

व्हाईटनॅक यांनी मोठ्या खुशीने या मागण्या मान्य केल्या. अखेर हरिभक्ती यांनी बडोद्यातील अन्य नामांकित व्यक्तींसोबत या करारावर सही केली. बँक स्थापनेच्या विचाराने हर्षोल्लसित झालेल्या तज्ज्ञांनी तिच्या यशस्वितेसाठी सर्वतोपरी साहाय्य करण्याची ग्वाही यावेळी दिली. वेळप्रसंगी गरज पडल्यास

बँकेला संपूर्ण वित्तपुरवठा करण्याची तयारी पेटलाड येथील भाईशेठ ईश्वरदास यांनी दर्शवली. तर या करारात समाविष्ट करण्यात आलेल्या १४ व्या कलमानुसार बँक ऑफ बडोदाने व्यवहार चालू केल्यावर त्याअगोदर कार्यरत असलेली बडोदा पेढी बंद करण्याचे मान्य करण्यात आले.

११ ऑगस्ट १९०७ रोजी बँकेचे प्रवर्तक आणि बडोद्यातील सावकार यांच्यामध्ये बैठक पार पडली. या बैठकीला अहमदाबादचे शेठ चिमणादास नागिनदास, मगनभाई हरिभक्तीवाला, शेठ चिमणलाल मोतीलाल, शेठ मोतीलाल गोर्धन, दाभोईचे शेठ हिम्मतलाल हरगोविंद, लीलाभाई झवेरी व अन्य सावकार उपस्थित होते. या बैठकीत बँक स्थापनेसाठी प्रमुख धनवंतांनी ८ लाख रु.व बडोदा सरकारने १० किंवा १२ लाख रु. भांडवल गुंतवावे असा प्रस्ताव शेठ हरिभक्ती यांनी मांडला. अखेर सरकारने ४% व्याजाने १० लाख रु.चे भांडवल बँकेत गुंतवावे अशी विनंती महाराजांना करण्याचा निर्णय घेण्यात आला. या टप्प्यावर सयाजीरावांनी बँकेचे प्रवर्तक आणि सावकारांनी संयुक्तपणे मांडलेल्या प्रस्तावाला मान्यता दिली. याचवेळी स्थानिक प्रवर्तक आणि बडोदा सरकार या दोन्ही घटकांना ही योजना अधिकाधिक लोकांपर्यंत पोचवणे आवश्यक असल्याचे जाणवले. संस्थानाबाहेरील कार्यक्षमता या बँकेशी जोडून घेण्याचा उद्देश यापाठीमागे होता.

मुंबई येथील सर विठ्ठलदास दामोदर ठाकरसी व सर लल्लुभाई श्यामलदास आणि अहमदाबाद येथील अंबालाल साकेरलाल देसाई व चिमणाबाई नागीनदास यांना बँक उभारणीच्या कार्यात सहकार्य करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. विशेष बाब म्हणजे या चारही व्यक्ती गुजराती होत्या. देशभक्त विचारांच्या या व्यक्ती सयाजीराव महाराजांच्या खास संपर्कातल्या होत्या. संस्थानाचे हित सांभाळतानाच आर्थिक राष्ट्रवादाची भावना जनतेत रुजवण्याचा त्यांचा मुख्य उद्देश होता. त्यांच्या कर्तव्यकठोर कार्यपद्धतीमुळे थोड्याच कालावधीत त्यांनी बडोद्यातील सावकारांची जागा घेतली. त्यानंतर बँक ऑफ बडोदाच्या वाटचालीत चारही व्यक्तींनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

बँक ऑफ बडोदाचे माहितीपत्रक तयार करण्यासाठी सयाजीरावांनी विठ्ठलदास ठाकरसी, लल्लुभाई श्यामलदास आणि व्हाईटनॅक यांच्या तीन सदस्यीय समितीची नेमणूक केली. बडोद्यातील अनेक बँक व्यावसायिकांनी बँकेचे समर्थन करणारे अनेक अभिप्राय समितीकडे नोंदवत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यादरम्यान समितीने आश्चर्यकारकपणे घेतलेल्या नवीन भूमिकेमुळे नवीन वाद निर्माण झाला. या त्रिसदस्यीय समितीने बँकेतील सरकारची ठेव २,५०,००० रु. इतकी मर्यादित करण्याची भूमिका घेतली. यावर १४ सप्टेंबर १९०७ रोजी आपली भूमिका मांडताना शेठ हरिभक्ती लिहितात, “जर बडोदा

सरकार १० लाख रु.ची ठेव बँकेत ठेवायला तयार नसेल तर या प्रकल्पावर यापुढे काम करणे शक्य नाही. स्वतः स्थापन केलेल्या बँकेवर जर बडोदा सरकारचा विश्वास नसेल तर जनतेमध्ये आपली ठेव या बँकेमध्ये ठेवण्यासाठीचा विश्वास निर्माण होणे अशक्य आहे."

हरिभक्ती यांच्या प्रतिक्रियेनंतर या वादाचे गांभीर्य समितीच्या लक्षात आले. समितीने बँक व्यावसायिकांच्या निम्म्या मागण्या मान्य करण्याची तयारी दर्शवली. परंतु बँक व्यावसायिकांनी याला नकार दिला. अखेर व्हाईटनॅक यांनी बँक व्यावसायिकांचे सर्व आक्षेप मान्य केले. अखेर बँक व्यावसायिक आणि समितीमध्ये समेट घडून येऊन समितीने आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याचे मान्य केले. संस्थानच्या एकूण १० लाख रु. ठेवीपैकी ७ लाख ५० हजार रु. ४ % व्याजदराने व उर्वरित २ लाख ५० हजार रु. विनाव्याज १५ वर्षे मुदतीने गुंतवण्यास समितीने मान्यता दिली. ३० ऑक्टोबर १९०७ रोजी समितीने ही योजना मान्यतेसाठी महाराजांकडे पाठवली. या योजनेला मान्यता देण्यापूर्वी ती पूर्णपणे समजून घेऊन बँक स्थापनेचा जनतेच्या आयुष्यावर होणारा परिणाम जाणून घेण्याची सयाजीरावांची इच्छा होती. म्हणून या योजनेसंदर्भातील विस्तृत अहवाल सादर करण्याची आज्ञा महाराजांनी व्हाईटनॅक यांना केली. त्याप्रमाणे व्हाईटनॅक यांनी विस्तृत अहवाल सादर करत बँकेसंदर्भातील विविध कागदपत्रे महाराजांना दाखवली. सर्व शंकांचे निरसन

झाल्यावर अखेर १६ डिसेंबर १९०७ रोजी सयाजीरावांनी या योजनेला मान्यता दिली.

७ मार्च १९०८ रोजी बँकेच्या तात्पुरत्या संचालक मंडळाची बैठक पार पडली. या बैठकीला व्हाईटनॅक आणि बडोद्यातील सावकारांचे शिष्टमंडळ उपस्थित होते. सर्व बाबींवर चर्चा होऊन एकमत झाल्यानंतरच बँकेची नोंदणी करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. यावेळी विठ्ठलदास ठाकरसी, समल बेचार, मगन पुरुषोत्तमभाई, हरिभक्ती आणि चुनीलाल नागीनदास यांनी व्हाईटनॅक यांना बँकेच्या संचालकपदी नियुक्त करण्याची मागणी केली. त्यांची ही मागणी महाराजांनी मान्य केली. जुलै १९०८ मध्ये बँकेच्या नोंदणीसाठी आवश्यक सर्व तयारी पूर्ण झाली. सुमारे दीड वर्षे चाललेली ही बँकेच्या स्थापनेसंदर्भातील सर्व चर्चा प्रामुख्याने संस्थानचे अधिकारी आणि बँक व्यावसायिक व बडोद्यातील सावकार यांच्यामध्येच झाली.

सर्वसामान्य जनता या सर्व घडामोडींपासून पूर्णतः अनभिज्ञ होती. बँक यशस्वी होण्यासाठी जनतेला तिच्याविषयी संपूर्ण माहिती असणे आवश्यक होते. म्हणूनच जनतेला बँकेचे ध्येय, उद्दिष्टे आणि उपयुक्तता यांची माहिती देण्यासाठी सार्वजनिक सभेचे आयोजन करण्याचे निश्चित ठरवण्यात आले. त्यानुसार बडोद्यात १९ जुलै १९०८ रोजी ही सार्वजनिक सभा पार पडली. या सभेला सर्वसामान्य जनतेबरोबरच बडोद्यातील नामवंत

सावकार, अर्थतज्ज्ञ, उद्योगपती आणि संस्थानचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. विशेष बाब म्हणजे बडोदा सरकारचा बँक स्थापनेस असणारा पाठिंबा दर्शवण्याच्या उद्देशाने सयाजीराव महाराज स्वतः या सभेला उपस्थित राहिले.

संस्थानाची आर्थिक स्थिती सक्षम असल्यामुळे सरकारला अशा प्रकारच्या बँकेची गरज नसली तरी जनतेच्या भल्यासाठी या बँकेची स्थापना केल्याची भूमिका सयाजीरावांनी या सभेत मांडली. बडोदा बँकेच्या स्थापनेमागची स्वतःची भूमिका आणि बँकेकडून असणाऱ्या अपेक्षा स्पष्ट करताना या सभेत सयाजीराव म्हणतात, “स्वत: सहकारी तत्त्वावर चालून नवीन संस्थानाही त्याच तत्त्वाचा वस्तुपाठ या बँकेने दिला पाहिजे आणि व्यापारविषयक व्यवहाराच्या आधुनिक पद्धती लोकांना शिकविण्याचे कामही या बँकेने सतत केले पाहिजे. मुंबईमध्ये स्वदेशी भांडवलावर नुकत्याच स्थापना झालेल्या दोन बँकांनी जे संपूर्ण यश संपादन केले आहे. त्यावरून निर्विवाद सिद्ध झाले आहे की, कोणत्याही देशातील हुशार बुद्धिवंताशी हिंदी अर्थशास्त्रज्ञ टक्कर देऊ शकतात. हिंदी लोकांतील काही जाती तर फार जुन्या काळापासून विविध सराफी व्यवहारांना एक उच्च कला म्हणून ओळखत आहेत.”

याच सभेत आर्थिक स्वातंत्र्य मिळवणे हेच स्वदेशीचे ध्येय असल्याचे स्पष्ट करताना महाराज म्हणतात, “औद्योगिक उन्नतीची पाश्चात्त्य तत्त्वे आपल्या देशाला लागू करणे हाच मला

सांप्रत काळी किमान प्रतिकाराचा व म्हणून सोपा असा मार्ग दिसतो. यासाठी संघटित स्वरूपाने प्रयत्न करणे अवश्य आहे. तसा एक खासगी प्रयत्न बडोदे बँकेच्या रूपाने करण्यात येत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.”

या सभेच्या आदल्या दिवशी १८ जुलै १९०८ रोजी सकाळी ११ वाजता सयाजीरावांनी हत्तीवरून बँक ऑफ बडोदाच्या कार्यालयात येऊन १०१ सोन्याची नाणी ठेव स्वरूपात बँकेत ठेवली. ही बँक ऑफ बडोदामधील पहिली ठेव होती. तर या सभेनंतर दुसऱ्या दिवशी २० जुलै १९०८ रोजी बडोदा कंपनी ॲक्ट, १८९७ अंतर्गत बँक ऑफ बडोदाची नोंदणी करण्यात आली. बडोद्याच्या मांडवी भागात बँकेची पहिली शाखा स्थापन करण्यात आली. बँकेच्या माहितीपत्रकात नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण गुजरात, काठीयावाड आणि मुंबई प्रांत हे तिचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यात आले होते. बँकेच्या संचालक मंडळात व्हाईटनॅक, संपतराव गायकवाड, बडोद्याचे महालेखापाल यांच्यासह नामवंत सावकार आणि अर्थतज्ज्ञांचा समावेश करण्यात आला होता. विठ्ठलदास ठाकरसी यांची बँकेचे पहिले अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. तर चार्ल्स इ. रँडल यांची व्यवस्थापकपदी नेमणूक करण्यात आली. १ सप्टेंबर १९०८ रोजी चार्ल्स इ. रँडल आपल्या कार्यालयात रुजू झाले. १५ जून १९१० रोजी बँक ऑफ बडोदाला राज्य बँकेचा दर्जा देण्यात आला. याच वर्षी अहमदाबाद येथे बँकेची शाखा सुरू करण्यात आली.

१९१३ ते १९१७ दरम्यान भारतात सुमारे ८७ बँका बंद पडल्या. परंतु या कठीण कालखंडात देखील सयाजीरावांच्या प्रामाणिक आणि कुशल नेतृत्वामुळेच बँक ऑफ बडोदा तग धरू शकली.

**बँक ऑफ बडोदा आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया**

भारतातील शिखर बँक मानल्या जाणाऱ्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना १९३५ मध्ये करण्यात आली. १९३४ च्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायद्यात नमूद केलेल्या तरतुदीनुसार 1 एप्रिल १९३५ पासून रिझर्व्ह बँकेने आपल्या कामकाजास सुरुवात केली. १९१३ मध्ये ब्रिटिश सरकारकडून नियुक्त करण्यात आलेल्या चेंबरलेन आयोगाच्या अहवालात केन्स यांनी भारतातील केंद्रीय बँकेच्या स्थापनेसाठीची विस्तृत योजना सर्वप्रथम मांडली. तर १९२६ मधील हिल्टन-यंग आयोगाने इम्पेरिअल बँक ऑफ इंडियाचे भारताच्या केंद्रीय बँकेत रूपांतर करण्याचा प्रस्ताव फेटाळत स्वतंत्र केंद्रीय बँकेच्या स्थापनेसाठीची योजना मांडली. या योजनेत मांडण्यात आलेल्या बहुतांश बाबी नंतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियामध्ये समाविष्ट करण्यात आल्या.

हिल्टन-यंग आयोगाने सादर केलेल्या अहवालावर कार्यवाही करत जानेवारी १९२७ मध्ये ब्रिटिश सरकारने रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेसाठीचे बिल कायदेमंडळात मांडले. कायदेमंडळाने नेमलेल्या संयुक्त निवड समितीने या मसुद्यात काही महत्त्वपूर्ण बदल केले. परंतु कायदेमंडळातील मतभेद आणि प्रचंड गोंधळातील मतदानानंतर फेब्रुवारी १९२८ मध्ये ब्रिटिश सरकारने

हे बिल मागे घेतले. पुढे १९३४ मध्ये ब्रिटिश सरकारने रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा संमत केला. १९३५ मध्ये लागू करण्यात आलेल्या Government Of India Act च्या १५३ व्या भागात रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेसाठीच्या आवश्यक बाबींचे स्पष्टीकरण देण्यात आले. अखेर १ एप्रिल १९३५ पासून रिझर्व्ह बँकेच्या कामकाजास सुरुवात झाली.

रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेपासूनच तिच्या स्थापनेपाठीमागचा उद्देश आणि बँकेची ध्येयधोरणे यावर भारतीय आर्थिक विश्वात सातत्याने चर्चा होत आली आहे. रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेचे तत्कालिक कारण स्पष्ट करताना 'Modern Banking In India' या ग्रंथात सुमंत मुरंजन लिहितात, "भारताच्या आर्थिक आणि बँकिंग क्षेत्राची गरज हे रिझर्व्ह बँकेच्या तातडीच्या स्थापनेपाठीमागील मुख्य कारण नव्हते. ब्रिटिश भारताच्या तत्कालीन केंद्र सरकारमध्ये होऊ घातलेले बदल हे त्यामागील महत्त्वपूर्ण कारण होते. या बदलानुसार सरकारचे अर्थमंत्र्याकडील खाते विधिमंडळाला जबाबदार असणाऱ्या अन्य मंत्र्याकडे सोपवण्यात येणार होते." रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेमागील भूमिका आणि बँक ऑफ बडोदाच्या स्थापनेमागील सयाजीरावांचे तत्त्वज्ञान तुलनात्मक दृष्टीने समजून घेतल्यास आजही आपल्याला सयाजीरावांच्या धोरणांची गरज का आहे, या प्रश्नाचे उत्तर स्पष्टपणे मिळते.

## बँक ऑफ बडोदाची वाटचाल

स्थापनेनंतर दुसऱ्याच वर्षी १९०९ मध्ये बँक ऑफ बडोदाचे खेळते भांडवल ६,९२,७०० रु. पर्यंत वाढले. तर या वर्षी बँकेने २३,८६,१०० रु. इतकी रक्कम सभासदांना कर्ज स्वरूपात दिली. १९०९ मध्ये बडोदा बँकेला ५१,००० रु. नफा झाला. १९११ मध्ये बँक ऑफ बडोदाचे खेळते भांडवल १० लाख रु. पर्यंत पोहोचले. तर नफ्याची रक्कम १,७५,००० रु. इतकी होती. १९११ मध्ये सुमारे ७२ लाख रु.ची कर्जे सभासदांना वितरित करण्यात आली. १९२९ मध्ये बडोदा बँकेचे खेळते भांडवल ३० लाख रु. पर्यंत पोहोचले तर बँकेचा राखीव निधी २३ लाख ५० हजार रु. होता.

या मजबूत आर्थिक स्थितीच्या आधारे बडोदा बँकेकडून बडोद्यातील केंद्रीय सहकारी बँकेलादेखील आर्थिक मदत पुरविली जात होती. केंद्रीय सहकारी बँका बडोद्यातील विविध सहकारी संस्थांना अर्थसाहाय्य करत होत्या. बडोदा संस्थानात बँक ऑफ बडोदाने सर्वप्रथम धनादेशाची सुविधा उपलब्ध करून दिली. त्याचप्रमाणे बँकेतील बचत खात्यांना प्रोत्साहन देऊन जनतेमध्ये बचतीची सवय रुजवण्याचा प्रयत्न केला. बडोदा संस्थानच्या किनारपट्टीवर ओखामंडल येथे उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक मिठावर प्रक्रिया करून शुद्ध मीठ उत्पादन करण्याच्या उद्देशाने ५ मे १९२७ रोजी ओखा सॉल्ट वर्कची स्थापना करण्यात आली. या कारखान्यात उत्पादित होणारे मीठ बंगालमध्ये मोठ्या

प्रमाणावर निर्यात केले जात असे. बडोदा बँकेकडून मिळालेल्या आर्थिक पाठबळामुळे हा उद्योग अल्पावधीत उत्तम प्रगती करू शकला. त्याचप्रमाणे द्वारका येथील सिमेंट कारखान्यालादेखील बँक ऑफ बडोदाचे उत्तम पाठबळ मिळाले. १९३२ मध्ये बँकेने सभासदांना दिलेली कर्जाऊ रक्कम २ कोटी रु.च्या घरात पोहोचली. तर या वर्षी बँकेला ४,६५,१०० रु. नफा झाला. बडोदा बँकेच्या सचोटीपूर्ण कारभारामुळे बँकेची आर्थिक स्थिती सातत्याने सुधारत गेली.

१९४७ मध्ये बँक ऑफ बडोदा ही संयुक्त भांडवल असणारी भारतातील पाचव्या क्रमांकाची बँक बनली. १९५८ मध्ये बँक ऑफ बडोदाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करण्यात आले. या वर्षी बडोदा बँकेत 'हिंद बँके'चे विलीनीकरण करण्यात आले. यामुळे हिंद बँकेच्या पूर्व पाकिस्तानातील एक आणि राजस्थानमधील दोन शाखांसह एकूण सहा शाखा बडोदा बँकेच्या अखत्यारीत आल्या. कोणत्याही भारतीय बँकेचे बडोदा बँकेत झालेले हे पहिले विलीनीकरण होते. १९५९ मध्ये भारतात स्टेट बँक ऑफ इंडिया सबसिडीअरी ॲक्ट संमत करण्यात आला. परंतु हा कायदा लागू होणाऱ्या बँकांच्या यादीत बँक ऑफ बडोदाचे नाव नसल्यामुळे बँकेची स्वतंत्र ओळख कायम राहिली.

१९६१ ते १९६४ या कालावधीत संकटात सापडलेल्या चार बँकांचे बँक ऑफ बडोदात विलीनीकरण करण्यात आले. यामध्ये न्यू सिटीझन बँक, उंबरगाव पीपल्स बँक, सूरत बँकिंग कॉर्पोरेशन

आणि तामिळनाडू सेंट्रल बँक यांचा समावेश होता. १९ जुलै १९६९ रोजी केंद्र सरकारने १३ बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांमध्ये बँक ऑफ बडोदाचादेखील समावेश होता. यावेळी राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांपैकी नफा कमावणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये बँक ऑफ बडोदाचा समावेश होता. तर १९६९ मध्ये बँक ऑफ बडोदाच्या ४३३ शाखा कार्यरत होत्या. यामध्ये २०९ ग्रामीण भागातील शाखांचा समावेश होता. ५ वर्षांतच १९७४ मध्ये बँक ऑफ बडोदाच्या शाखांची संख्या ८१७ पर्यंत पोहोचली. यापैकी ४८० शाखा ग्रामीण भागात कार्यरत होत्या.

१९७६ मध्ये उत्तरप्रदेशातील रायबरेली येथे बँक ऑफ बडोदाची पहिली ग्रामीण विभागीय शाखा सुरू करण्यात आली. १९८० मध्ये बँक ऑफ बडोदाची १० ग्रामीण विभागीय कार्यालये कार्यरत होती. १९८५ मध्ये बडोदा बँकेने क्रेडिट कार्डची सुविधा सुरू केली. नोव्हेंबर १९९७ मध्ये केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयाने स्वायत्त पॅकेजच्या अंमलबजावणीची घोषणा केली. या पॅकेजची अंमलबजावणी करणारी बँक ऑफ बडोदा ही सार्वजनिक क्षेत्रातील पहिली बँक ठरली. १९९९-२००० मध्ये बँक ऑफ बडोदाच्या एकूण २,६५२ शाखा कार्यरत होत्या. २००१ मध्ये भारतातील बँकेच्या ए.टी.एम. सुविधेचा विस्तार करण्यासाठी बडोदा बँकेने नवीन योजना आखली.

२००२ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या विनंतीवरून देशभरात १०५ शाखा कार्यरत असणारी बनारस स्टेट बँक बडोदा बँकेत विलीन करण्यात आली. २००२ मध्ये गुजरातमधील धार्मिक दंगलग्रस्तांसाठी बडोदा बँकेने २ विशेष योजना सुरू केल्या. तर याच वर्षी दहशतवादी हल्ल्यात नुकसान झालेल्या अक्षरधाम मंदिराच्या डागडुजीसाठी बडोदा बँकेने १ लाख रु. ची देणगी दिली. स्थापनेनंतर ९४ वर्षांनीदेखील बँक ऑफ बडोदाने 'सयाजीविचार' जपल्याचा हा पुरावा आहे. २००५ मध्ये बँकेने आपल्या लोगोमध्ये बदल करून नवीन लोगो स्वीकारला. २१ देशातील २८०० ठिकाणी एकाचवेळी या लोगोचे उद्घाटन करण्यात आले.

'सयाजीमार्गा'ने वाटचाल करत यशाची नवनवी शिखरे पादाक्रांत करणारी बँक ऑफ बडोदा समाजाच्या विकासातील आपली जबाबदारी तितक्याच सक्षमपणे पार पाडत आहे. भारतातील बेरोजगार तरुणांना उद्योगविषयक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यासाठी बँक ऑफ बडोदा देशभरात ६४ प्रशिक्षण केंद्रे चालवते. ३१ मार्च २०२० पर्यंत या केंद्रांच्या माध्यमातून ५,०३,१४५ भारतीय तरुणांना उद्योगविषयक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये अनुसूचित जातीतील ८५,६८५, अनुसूचित जमातीतील १,११,२९६, अल्पसंख्याक समाजातील ४२,६४५ आणि इतर मागास वर्गातील १,५७,२३१ तरुणांचा समावेश होता. आजही ही बँक सयाजीरावांच्या सर्वसमावेशक

धोरणाशी आपले नाते किती भक्कमपणे टिकवून आहे हेच यावरून कळते.

तर २०१९-२० या आर्थिक वर्षात बँक ऑफ बडोदाने सी.एस. आर. अंतर्गत शिक्षण आणि कौशल्य विकासासाठी ४ कोटी रु., आरोग्यविषयक सुविधांवर ७९ लाख रु. आणि सामाजिक आर्थिक विकासासाठीच्या उपक्रमांवर ६४ लाख रु. अशी एकूण ५ कोटी ४७ लाख रु. इतकी रक्कम खर्च केली.

## आंतरराष्ट्रीय 'झेप'

'भारताची आंतरराष्ट्रीय बँक' अशी टॅगलाईन असणाऱ्या बँक ऑफ बडोदाने १९५३ मध्ये केनियातील मोम्बासा (Mombasa) येथे आपली पहिली आंतरराष्ट्रीय शाखा स्थापन केली. याच वर्षी युगांडा देशातील कंपाला (Kampala) येथे बडोदा बँकेची शाखा सुरू करण्यात आली.  १९५३ मध्ये आंतरराष्ट्रीय शाखा सुरू करणारी ही तत्कालीन एकमेव भारतीय बँक असावी. १९५४ मध्ये नैरोबी येथे बँक ऑफ बडोदाची केनियातील दुसरी शाखा सुरू करण्यात आली. १९५५ मध्ये केनियातून ब्रिटनमध्ये स्थलांतरित होणाऱ्या भारतीयांसाठी बँक ऑफ बडोदाने लंडनमध्ये एक शाखा सुरू केली. १९५७ मध्ये बँकिंग क्षेत्राचे आंतरराष्ट्रीय केंद्र असणाऱ्या लंडनमध्ये आपली शाखा सुरू करून बडोदा बँकेने महत्त्ववपूर्ण टप्पा गाठला.

१९६१ मध्ये फिजी येथे तर १९६२ मध्ये मॉरिशस येथे बडोदा बँकेच्या शाखा स्थापन करण्यात आल्या. १९६५ मध्ये दक्षिण

अमेरिका खंडातील गयाना येथे बँक ऑफ बडोदाची शाखा सुरू झाली. याच वर्षी भारत-पाकिस्तान युद्धामुळे बडोदा बँकेला पूर्व पाकिस्तानातील नारायणगंज येथील शाखा बंद करावी लागली. तर १९६७ मध्ये टांझानिया देशातील सरकारने दार-ए-सलाम, म्वांगा आणि मोशी येथील बडोदा बँकेच्या तीन शाखांचे राष्ट्रीयीकरण करून नॅशनल बँकिंग कॉर्पोरेशन या सरकारी संस्थेकडे सोपवल्या.

१९७२ मध्ये भारत सरकारच्या बँक ऑफ इंडियाचे युगांडा देशातील सर्व आर्थिक व्यवहार बडोदा बँकेकडे सोपवण्यात आले. १९७४ मध्ये दुबई आणि अबुधाबी येथे बडोदा बँकेच्या शाखा स्थापन झाल्या. तर दोन वर्षांनी १९७६ मध्ये ओमन देशामध्ये आणि बेल्जियममधील ब्रुसेल्स शहरात बडोदा बँकेच्या शाखा सुरू करण्यात आल्या. बेल्जियममधील अँटवर्प (Antwerp) शहरातील ज्वेलरी आणि हिऱ्यावरील नक्षीकामाच्या व्यवसायात मुंबईस्थित अनेक व्यापारी संस्था गुंतवणूक करत. या संस्थांना बँकिंग सेवा पुरवण्याच्या उद्देशाने ब्रुसेल्स येथील शाखा सुरू करण्यात आली होती.

१९७८ मध्ये अमेरिकेतील न्यूयॉर्कमध्ये बडोदा बँकेची शाखा स्थापन करण्यात आली. १९८० मध्ये बँक ऑफ बडोदा, युनियन बँक ऑफ इंडिया आणि इंडियन बँक या तीन बँकांनी एकत्रितपणे हाँगकाँग येथे आय.यू.बी. इंटर नॅशनल फायनान्स या ठेवी स्वीकारणाऱ्या परवानाधारक संस्थेची स्थापना केली.

या संस्थेत तीनही बँकांनी समान गुंतवणूक केली होती. १९९९ मध्ये बडोदा बँकेने इतर दोन संस्थांचे भाग विकत घेऊन या संस्थेचा संपूर्ण ताबा मिळवला. १९९३ मध्ये युनियन बँक ऑफ इंडिया आणि पंजाब ॲण्ड सिंध बँकेच्या लंडन येथील शाखा बडोदा बँकेत विलीन करण्यात आल्या. १९९७ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील दरबान येथे बँक ऑफ बडोदाची शाखा स्थापन करण्यात आली.

१९९८ मध्ये बँक ऑफ बडोदाने BoBGLOBAL ही व्हिसाशी संलग्न असलेली आंतरराष्ट्रीय वापरासाठीची क्रेडिट कार्ड सुविधा सुरू केली. हे अशा प्रकारचे भारतातील पहिले क्रेडिट कार्ड होते. हे क्रेडिट कार्ड ६० देशांतील १ कोटीहून अधिक आस्थापनांमध्ये वापरता येते. २००० मध्ये दक्षिण आफ्रिकेतीलच बोट्सवना या देशात बडोदा बँकेच्या शाखा सुरू करण्यात आली. बोट्सवनामधील गबोरोन येथे दोन आणि फ्रान्सिस्टाउनमध्ये एक अशी एकूण ३ कार्यालये सुरू करण्यात आली. २००२ मध्ये युगांडा सेक्युरिटी एक्स्चेंज या युगांडा देशाच्या स्टॉक मार्केटमधील व्यापारी कंपनी म्हणून बँक ऑफ बडोदाची नोंदणी करण्यात आली. जुलै २०१४ मध्ये युगांडाच्या स्टॉक मार्केटमध्ये १६ कंपन्या व्यापार करत होत्या.

२००४मध्येमलेशियामधीलकुआलालुम्पूरआणिचीनमधील गुआंगडोंग येथे बडोदा बँकेच्या शाखा स्थापन करण्यात आल्या. २० देशांत कार्यरत १९०० हून अधिक शाखांमधील व्यवहार

सुरळीत होण्यासाठी २००५ मध्ये बँक ऑफ बडोदाने मुंबईत ग्लोबल डाटा सेंटर नामक केंद्रीय यंत्रणा उभी केली. २००७ मध्ये बडोदा बँकेने २ अब्ज रु. व्यवसायाचा टप्पा पार केला. यावर्षी बँक ऑफ बडोदा जगभरातील २००० हून अधिक शाखांद्वारे सुमारे २ कोटी ९० लाख हून अधिक ग्राहकांना सेवा पुरवत होती. २००९ मध्ये न्यूझीलंडमध्ये बँक ऑफ बडोदाची नोंदणी करण्यात आली. २०११ मध्ये दुबईतील शारजा येथे बँक ऑफ बडोदाने इलेक्ट्रॉनिक बँकिंग सेवा विभाग सुरू केला.

२०२१ मध्ये बँक ऑफ बडोदा १९ देशातील ८५४४ शाखांच्या माध्यमातून सुमारे १४ कोटी ग्राहकांना बँकिंग सेवा पुरवत आहे. यापैकी ९६ शाखा परदेशात कार्यरत आहे. विशेष बाब म्हणजे भारतातील एकूण ८१९२ शाखांमधील सर्वाधिक २८४७ शाखा ग्रामीण भागात कार्यरत आहेत. बँक ऑफ बडोदामध्ये सुमारे ८४,२८३ कर्मचारी काम करत असून बँकेच्या १०,००० हून अधिक ए.टी.एम. मशीन्सचे जाळे संपूर्ण भारतात विस्तारले आहे.

त्रिनिदाद आणि घाना या देशात शाखा सुरू करण्यासाठी संबंधित देशांकडून आवश्यक परवानग्या बँक ऑफ बडोदाला मिळाल्या आहेत. तर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने न्यूझीलंड आणि मालदीवमध्ये शाखा सुरू करण्याची परवानगी बडोदा बँकेला दिली आहे. कॅनडा, श्रीलंका, बहारीन, सौदी अरेबिया आणि रशिया या देशांमध्ये बँक ऑफ बडोदाच्या शाखा उभारण्याचे काम सुरू आहे. दक्षिण आफ्रिकेतील अनेक देश, कुवेत,

मोझांबिक आणि कतार या देशात विविध ठिकाणी शाखा सुरू करण्यासाठी परवानगी मिळण्याची बडोदा बँकेला प्रतीक्षा आहे. तर भविष्यात ब्रिटन, युनायटेड अरब अमिरात आणि बोटस्वाना या देशांमध्ये आपला व्यवसाय विस्तारण्याचे बडोदा बँकेचे उद्दिष्ट आहे.

आजची बँक ऑफ बडोदाची आंतरराष्ट्रीय घोडदौड पाहता महाराजा सयाजीरावांनी आपला देश आणि समाज जागतिक स्पर्धेत टिकून जगातील प्रतिष्ठित राष्ट्रांच्या पंगतीत बसला पाहिजे हे १२० वर्षांपूर्वी ठेवलेले ध्येय बँकिंग क्षेत्रात पूर्णत्वाकडे जाताना दिसते.

## बँक ऑफ बडोदा आणि इतर समकालीन संस्थानांच्या बँका

बँक ऑफ बडोदाच्या स्थापनेवेळी बडोद्याबरोबरच म्हैसूर आणि त्रावणकोर ही संस्थाने भारतातील सर्वांत प्रगत संस्थाने म्हणून ओळखली जात होती. या पार्श्वभूमीवर म्हैसूर आणि त्रावणकोरमधील बँकांच्या वाटचालीचा बडोदा बँकेच्या संदर्भात तुलनात्मक आढावा घेणे उचित ठरेल. म्हैसूरचे महाराजा कृष्णराज वाडियार यांनी संस्थानच्या आर्थिक विकासाचा आढावा घेण्यासाठी एम. विश्वेश्वरय्या यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नियुक्ती केली. या समितीच्या शिफारशीनुसार बडोदा बँकेच्या स्थापनेनंतर ५ वर्षांनी १९ मे १९१३ रोजी म्हैसूरचे महाराजा कृष्ण राज वाडियार यांनी बँक ऑफ म्हैसूरची स्थापना

केली. २ ऑक्टोबर १९१३ पासून या बँकेने व्यवसायाला सुरुवात केली. तर बडोदा बँकेच्या स्थापनेनंतर ३७ वर्षांनी १२ सप्टेंबर १९४५ रोजी त्रावणकोरचे दिवाण रामास्वामी अय्यर यांच्या पुढाकाराने त्रावणकोर बँकेची स्थापना करण्यात आली. बँक ऑफ म्हैसूरच्या स्थापनेवेळी बँकेला आवश्यक २० लाख रु. चे संपूर्ण भांडवल म्हैसूरचे महाराजा कृष्णराज वाडियार यांनी शासकीय तिजोरीतून उपलब्ध करून दिले. तर बँक ऑफ त्रावणकोरच्या स्थापनेवेळी एकूण भांडवलाच्या केवळ २५% भांडवल त्रावणकोर सरकारकडून पुरवण्यात आले. याउलट सयाजीरावांनी बँकेला संपूर्णपणे सरकारवर अवलंबून न ठेवता आवश्यक तितके भांडवल पुरवण्याचे धोरण स्वीकारले. बडोदा बँकेतील एकूण १० लाख रु. शासकीय गुंतवणुकीपैकी ७ लाख ५० हजार रु. ४ % व्याजदराने व उर्वरित २ लाख ५० हजार रु. विनाव्याज १५ वर्षांच्या मुदतीसाठी गुंतवण्यात आले. बँकेच्या माध्यमातून जनतेच्या आर्थिक विकासाला चालना देतानाच बँकेवर संपूर्ण नियंत्रण न ठेवता प्रशासकीय स्वायत्तता देण्याचे सयाजीरावांचे धोरण त्यांच्यातील 'लोकशाहीवादी' राज्यकर्त्याची प्रचीती देते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५९ मध्ये भारतात स्टेट बँक ऑफ इंडिया सबसिडीअरी ॲक्ट संमत करण्यात आला. या धोरणानुसार १० सप्टेंबर १९५९ रोजी बँक ऑफ म्हैसूरचे 'स्टेट बँक ऑफ म्हैसूर' मध्ये रूपांतर करण्यात आले. तर पुढील वर्षी १९६०

मध्ये त्रावणकोर बँकेचे 'स्टेट बँक ऑफ त्रावणकोर' मध्ये रूपांतर करण्यात आले. परंतु १९५३ पासून जगभरातील विविध देशांमध्ये आपल्या शाखा सुरू करणाऱ्या बँक ऑफ बडोदाला या योजनेतून वगळण्यात आले. त्यामुळे बडोदा बँकेची स्वतंत्र ओळख कायम राहिली.

जून २०१४ मध्ये बँक ऑफ म्हैसूरच्या एकूण ९७६ शाखा कार्यरत होत्या. यापैकी ७९% शाखा (७७२) या एकट्या कर्नाटक राज्यात कार्यरत होत्या. याउलट बँक ऑफ बडोदाच्या संस्थानाबाहेर भारत आणि जगभरातील विस्ताराचे सप्रमाण विवेचन याआधीच्या विश्लेषणामध्ये केले आहे. तर मार्च २०१५ मध्ये भारतातील १८ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये स्टेट बँक ऑफ त्रावणकोरच्या १,१५७ शाखा कार्यरत होत्या. या पार्श्वभूमीवर समकालीन प्रगत संस्थानातील बँकांपैकी बँक ऑफ बडोदा ही जगभर विस्तारलेली एकमेव बँक ठरते.

१५ फेब्रुवारी २०१७ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने स्टेट बँक ऑफ त्रावणकोरसह अन्य ४ बँकांचे स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये विलीनीकरण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार ३१ मार्च २०१७ रोजी या ५ बँका स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये विलीन करण्यात आल्या. याउलट १७ सप्टेंबर २०१८ रोजी भारत सरकारने आर्थिक अडचणीत सापडलेल्या विजया बँक आणि देना बँक या दोन बँका वाचवण्यासाठी त्या बँक ऑफ बडोदामध्ये विलीन करण्याचा प्रस्ताव मांडला. या विलीनीकरणाच्या प्रस्तावाला

केंद्र सरकार आणि तिन्ही बँकांच्या संचालक मंडळांनी २ जानेवारी २०१९ रोजी परवानगी दिली. त्यानुसार १ एप्रिल २०१९ रोजी दोन्ही बँका बडोदा बँकेत विलीन करण्यात आल्या. या विलिनीकरणानंतर बँक ऑफ बडोदा ही स्टेट बँक ऑफ इंडिया आणि एच.डी.एफ.सी. बँकेनंतर भारतातील तिसरी सर्वांत मोठी बँक ठरली.

स्वातंत्र्यपूर्व भारतातील विविध संस्थानांच्या बँकांचा तुलनात्मक आढावा घेताना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने प्रसिद्ध केलेले १९५१-१९६७ या कालावधीतील अहवाल उपयुक्त ठरतात. मार्च १९५२ मध्ये भारतात ५४ संस्थानांच्या बँका कार्यरत होत्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या सर्व बँका भारत सरकारने आपल्या ताब्यात घेतल्या. या संदर्भात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्यावतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या १९५१-१९६७ कालावधीतील अहवालात काही निरीक्षणे नोंदवण्यात आली आहेत. हा अहवाल सांगतो, “स्वातंत्र्यापूर्वी या संस्थांमध्ये संस्थानांच्या राज्यकर्त्यांचे जे हितसंबंध गुंतले होते तेच हितसंबंध बदलत्या राजकीय परिस्थितीमध्ये स्वतंत्र भारतातील राज्यांचे गुंतले आहेत. आकारमानानुसार विचार करता संस्थानांच्या बँकांमध्ये प्रचंड फरक आहे. उदाहरणार्थ, समकालीन संस्थानांच्या बँकांपैकी सर्वांत मोठी बँक असणाऱ्या बँक ऑफ बडोदाकडे करोडो रुपयांच्या ठेवी आहेत. तर दुसऱ्या बाजूला बँक ऑफ बरवानीकडे असणाऱ्या एकूण ठेवींची रक्कम ३,००० रु. भरते.”

बँक ऑफ बडोदाच्या उत्तम कार्याची साक्ष या अहवालातून मिळते.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या या अहवालात तत्कालीन संस्थांनी बँकांचे स्थापना आणि मालकी यानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. संपूर्ण खासगी मालकी असणाऱ्या कृष्ण राम बलदेव बँकेची स्थापना ग्वाल्हेरच्या महाराजांकडून करण्यात आली होती. काही संस्थानांमध्ये शासकीय विभागांच्या पूर्णतः अथवा अंशतः नियंत्रणाखालील व्यावसायिक बँकांद्वारे वित्तीय कामकाज पार पाडले जात असे. काही संस्थानामध्ये स्थानिक प्रशासनाने पारित केलेल्या कायद्यांनुसार बँकांचे कामकाज चालवले जात होते. तर याउलट राजाच्या केवळ तोंडी आदेशावरून दुंगारपूर येथील श्री रामचंद्र लक्ष्मण बँकेची स्थापना करण्यात आली होती. या बँकेच्या कामकाजासाठी कोणतेही लिखित नियम निश्चित करण्यात आले नव्हते. संस्थानाने लागू केलेल्या कंपनी ॲक्टअंतर्गत बँकेची नोंदणी करून तिचे कामकाज पार पाडणारी बँक ऑफ बडोदा ही तत्कालीन भारतातील संस्थानांमधील एकमेव बँक ठरते. २०१९ मध्ये विजया आणि देना या दोन बँकांचे बडोदा बँकेत विलीनीकरणानंतर बँक ऑफ बडोदा ही भारतातील तिसऱ्या क्रमांकाची बनली.

बँक ऑफ बडोदाच्या स्थापनेसाठी सयाजीरावांनी खासगी सावकार, बडोद्यातील जनता आणि संस्थान यांच्यात समन्वयाचे नाते निर्माण करण्याचा प्रयत्न सर्वप्रथम केला. अमेरिकन

अर्थतज्ज्ञाला या कामाच्या नेतृत्वस्थानी ठेवून स्थापनेपासूनच या बँकेच्या ध्येयधोरणाला आंतरराष्ट्रीय दिशा दिली. व्यावसायिक नफ्याबरोबर समाजातील दुर्बल घटकांप्रति ही बँक स्थापनेपासून सामाजिक बांधिलकी जोपासताना दिसते. व्यावसायिक दृष्टिकोनाला समाजकल्याणाची भक्कम जोड या बँकेने दिली असल्याचे दिसते. सयाजीरावांनी राज्यकारभार हाती घेतला तेव्हा आर्थिकदृष्ट्या अडचणीत असणाऱ्या बडोदा संस्थानला संपन्नतेच्या शिखरावर नेले. सयाजीरावांनी जगातील ८ व्या क्रमांकाचा श्रीमंत हा लौकिक मिळवला. समाजविकासाच्या जगभरातील उपक्रमांना आजच्या रुपयाच्या मूल्यात २ लाख २० हजार ८१४ कोटी रु. इतकी मदत दिली. सयाजीरावांनी आपल्या आर्थिक व्यवस्थापनातून जशी संपत्ती निर्माण केली तशी ती योग्य नियोजनाद्वारे जनकल्याणासाठी वापरली. बँक ऑफ बडोदाचा आजचा लौकिक पाहता सयाजीरावांच्या या धोरणाची जोपासना बँक ऑफ बडोदा करत आहे ही बाब अभिमानास्पद ठरते.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०



## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :

**❐ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com